**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत मजुरांना दिलेली जॉब कार्ड मजुरांकडे ठेवणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**

**नियोजन विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक- मग्रारो-२०१४/प्र.क्र.११८/मग्रारो-१०अ**

मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

दिनांक:- १३ ऑक्टोबर, २०१७.

वाचा:- १) केंद्र शासनाचा महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम २००५.

२) केंद्र शासनाच्या ग्रामीण विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांचे क्रमांक-१९०६०/ ३/ २०१२-आरई-६, दिनांक २८ एप्रिल, २०१४ चे अ.शा.पत्र.

३) केंद्र शासनाने निर्गमित केलेले मास्टर सर्क्युलर सन २०१६-१७

४) शासन पत्र क्रमांक-मग्रारो-२०१४/ प्र.क्र.११८/ मग्रारो-१०अ, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१४ चे पत्र.

**परिपत्रक**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अधिनियम, २००५ (सुधारित) मधील परि. क्रमांक ५ अनुसुची-२ अन्वये मजुरांना दिलेली जॉब कार्ड ही मजुरांकडे ठेवण्याबाबतची तरतूद करण्यात आलेली आहे. या तरतूदीनुसार या योजनेतर्गत मजुरांना दिलेली जॉब कार्ड ही मजुरांकडे ठेवणे आवश्यक आहे. तसेच सन २०१७-१८ मध्ये केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मास्टर सर्क्युलर मधील परि ३.१ मध्ये स्पष्टपणे नमुद केले आहे की, काही विशिष्ट कारणाशिवाय मजुरांची जॉब कार्ड ग्राम पंचायत कार्यालयात आढळल्यास तो गुन्हा ठरविण्यात येवून त्याबाबत कलम २५ अन्वये संबंधितांवर कारवाई करण्यात येईल.

उपरोक्त मास्टर सर्क्युलर मधील निर्देशास अनुसरून शासन पत्र क्रमांक- मग्रारो-२०१४/प्र.क्र.११८/मग्रारो-१०अ, दिनांक २१ ऑक्टोबर, २०१४ अन्वये आवश्यक त्या सूचना सर्व संबंधितांना देण्यात आल्या आहेत. तथापि, उपरोक्त बाबतची कार्यवाही झाली नसल्याची बाब निदर्शनास आली आहे. तेव्हा मजुरांना देण्यात आलेली जॉब कार्ड ग्राम पंचायत कार्यालयास ठेवल्यास त्यामध्ये ब-याच अडचणी निर्माण होवू शकतात तसेच ती

हाताळण्यास अडचणी निर्माण होतात. तसेच मजुरांना त्यांनी किती दिवस काम केले व किती मजुरी मिळाली याबाबतची त्यांना माहिती नसते. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या जॉब कार्डच्या अंमलबजावणीमध्ये पारदर्शकता हे एक मुलभूत तत्व आहे, त्यामुळे केंद्र शासनाने निर्गमित केलेल्या मास्टर सर्क्युलर सन २०१६-१७ मधील परि.२.१.१ सुचना विचारात घेऊन संबंधित जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्याचा आढावा घेऊन या कार्यक्रमांतर्गत मजुरांना दिलेली जॉब कार्ड ही ग्राम पंचायत कार्यालयात ठेवली असल्यास ती संबंधित मजुरांकडे तात्काळ देण्यात यावी. तसेच ग्रामपंचायतीमध्ये कोणत्याही मजुराचे जॉबकार्ड राहणार नाही याची दक्षता घ्यावी.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१७१०१३१५५५१५६२२१६ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

DAWALE
EKNATH
RAJARAM

Digitally signed by DAWALE EKNATH RAJARAM
DN: c=IN, o=DAWALE EKNATH RAJARAM, 2.5.4.20=499dd4df91587ffef1e20a2ee9e560dd0777e49ff6cfc838f362fdbb58c58e7b, ou=ALL INDIA SERVICR,CID - 4317051, postalCode=443106, st=Maharashtra, cn=DAWALE EKNATH RAJARAM
Date: 2017.10.13 15:42:12 +05'30'

**( एकनाथ डवले )**
सचिव (रोहयो), महाराष्ट्र शासन

**प्रत,**

१) सर्व विभागीय आयुक्त
२) आयुक्त (कृषी), महाराष्ट्र राज्य पुणे
३) प्रधान मुख्य संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
४) संचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
५) उपसचिव (रोहोयो समिती) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई
६) सर्व जिल्हाधिकारी ( मुंबई व मुंबई उपनगर वगळुन)
७) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
८) विभागीय कृषी सहसंचालक, ठाणे/कोल्हापुर/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/ नागपूर/ लातुर

९) सर्व अधिक्षक कृषी अधिकारी,

१०) सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/ पुणे / नाशिक/ औरंगाबाद/ अमरावती/ कोकण वृत्त ठाणे

११) सर्व मुख्य वनसंरक्षक/ सर्व उप वनसंरक्षक

१२) सर्व विभागीय वन संरक्षक/ सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी,

१३) सर्व उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग,

१४) सर्व प्रकल्फ संचालक, जिल्हा ग्रामीण विकास संस्था

१५) सर्व उपसचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी (मग्रारोहयो), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२

१६) निवड नस्ती, कार्यासन रोहयो-१०अ, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-४०००३२.